bluebytes
news that matters

लोकमत

Friday, September 24, 2010

**Will this no-smoking campaign stick?**

Publication: Lokmat, Edition: Mumbai, Supplement: Hello Mumbai, Journalist: Bureau, Page No: 3, Location: Middle-Right, Width(cms): 5, Height(cms): 20, Size(sq.cms): 100

# सिगारेटच्या पाकिटांवर आमची छायाचित्रे लावा

**मुंबई, दि. २३ (प्रतिनिधी)** - तंबाखूमुळे होणाऱ्या दुष्परिणामांची तीव्रता नागरिकांच्या लक्षात यावी यासाठी गुटखा, सिगारेट यासारख्या तंबाखूजन्य पदार्थांच्या पाकिटांवर आमची छायाचित्रे लावा, जेणेकरून तंबाखूमुळे झालेल्या आम्हा कर्करुग्णांना पाहून तरी लोकांमध्ये जागृती होईल, अशी मागणी टाटा मेमोरियल रुग्णालयातील कर्करुग्णांनी आज केंद्रीय आरोग्य व कुटुंब कल्याण राज्यमंत्री दिनेश त्रिवेदी यांच्याकडे केली.

दुसऱ्या राष्ट्रीय तंबाखू किंवा आरोग्य परिषदेच्या उद्घाटनप्रसंगी हे कर्करुग्ण एकत्र आले होते. या परिषदेत जगभरातील तीनशेहूनही अधिक कार्यकर्ते आणि संशोधक तंबाखू नियंत्रणविषयक योजनांबाबत चर्चा करणार आहेत. ही राष्ट्रीय परिषद तंबाखू नियंत्रणासाठी देशातील सर्वात मोठे व्यासपीठ आहे. सलाम बॉम्बे फाऊंडेशन, हिलीस सेख सारिया इन्स्टिट्यूट फॉर पब्लिक हेल्थ, ॲक्ट इंडिया या सामाजिक संस्था आणि केंद्राचे आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्रालय, राज्याचे आरोग्य मंत्रालय यांनी संयुक्तरीत्या या परिषदेचे आयोजन केले आहे.

## कर्करुग्णांची केंद्रीय राज्यमंत्र्यांकडे मागणी

या परिषदेमुळे देशात तंबाखू नियंत्रणाला चालना मिळू शकेल तसेच ग्रामीण भाग व छोट्या शहरात तंबाखूविरोधात जागरूकता निर्माण करणाऱ्या सामाजिक संस्था आणि व्यक्तींना एकत्र आणणे हा या परिषदेमागील उद्देश असल्याचे परिषदेचे अध्यक्ष पी.सी. गुप्ता यांनी सांगितले.

पहिल्या परिषदेत केवळ शंभर सदस्य सहभागी झाले होते. त्या तुलनेत यंदा जगभरातील तीनशे सदस्य सहभागी झाले असून केंद्र आणि राज्य सरकारबरोबरच जागतिक आरोग्य संघटनेचा सक्रिय सहभाग या परिषदेला लाभल्याचे सलाम बॉम्बे फाऊंडेशनच्या संचालिका पद्मिनी सोमाणी यांनी सांगितले.